29-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/28/2025 10:26 PM Page 1

डिजिटल भारताचे शिल्पकार बना

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत साखळी महाविद्यालयात लेनोवो डिजिटल इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २८ : गोव्यातील हुशार विद्यार्थ्यांचे भविष्य त्यांच्याच हातात असून मोठे स्वप्न पहा, धाडसीपणे नाविन्यपूर्ण व्हा आणि डिजिटल भारताचे शिल्पकार बनाअसे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले.

राज्यातील सर्व सरकारी महाविद्यालयात विविध क्षेत्रातील स्टार्ट अप केंद्र सुरू करण्यात येणार असून त्या माध्यमातून कौशल्य विकास, उत्तम संभाषण व इतर कौशल्य प्राप्त व्हावे हा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी स्पष्ट केले.

साखळी येथील शासकीय कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात लेनोवो डिजिटल इनोव्हेशन लॅबचे उद्घाटनमुख्य मंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

लेनोवो इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक शैलेंद्र कात्याल यावेळी उपस्थित होते.

हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० च्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत असून, विद्यार्थ्यांना एआय, रोबोटिक्स, कोडिंग आणि डिझाइनमध्ये भविष्यासाठी तयार कौशल्ये प्रदान केली जातात.

हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी लेनोवो, भारतकेअर्स आणि सीएसआरबॉक्ससोबत भागीदारी करताना तंत्रज्ञान-चालित शिक्षण वाढवण्याची आमची वचनबद्धता पूर्वीपेक्षाही अधिक मजबूत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले

साखळी : सरकारी महाविद्यालयात लेनोवो डिजिटल इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व मान्यवर.

स्मार्ट क्लासरूमपासून ते आयटीआयमध्ये कौशल्य प्रशिक्षण, एआय चॅटबॉट्स ते पंचायतींमध्ये ई-गव्हर्नन्सपर्यंत, आम्ही एक स्वयंपूर्ण गोवा बांधत आहोत जो समावेशक, नाविन्यपूर्ण आणि भविष्यासाठी सज्ज असेल, असेही मुख्यमंत्री यांनी सांगितले

गोव्यातील हुशार विद्यार्थ्यांसाठी, भविष्य तुमच्या हातात. मोठे स्वप्न पहा, धाडसीपणे नाविन्यपूर्ण व्हा आणि डिजिटल भारताचे शिल्पकार बनाअसे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले राज्यातील सर्व सरकारी महाविद्यालयात विविध क्षेत्रातील स्टार्ट अप केंद्र सुरू करण्यात येणार असून त्या माध्यमातून कौशल्य विकास, उत्तम संभाषण व इतर कौशल्य प्राप्त व्हावे हा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी स्पष्ट केपरिपूर्ण व विविध भाषा आत्मसात करताना तांत्रिक डिजिटल व इतर चौफेर ज्ञान घेणे करिअर साठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे उत्तुंग तेचे स्वप्न साकार करा, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

पान १ वरून

खरगे यांची गोव्यातील पहिली जाहीर सभा रद्द

अंतर्गत कार्यक्रम असल्याने मी यावर टिप्पणी करणार नाही. इंडिया आघाडी आणि निवडणूकपूर्व आघाडीचा भागीदार असलो तरी या कार्यक्रमासाठी कोणताही संवाद झालेला नाही. मात्र, प्रमुख विरोधी पक्ष म्हणून लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात आणि संघटन मजबूत करण्यात ते यशस्वी व्हावेत, ही शुभेच्छा.

खरगे यांच्या गोव्यातील पहिल्याच दौऱ्यातील जाहीर सभा रद्द झाल्यामुळे काँग्रेसच्या संघटनात्मक तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घटनेचा पक्षाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ओम साई सहायता संस्थेतर्फे शिल्पा वरक यांना आर्थिक मदत

कुडचिरे : मंदार अस्नोडकर यांच्याकडून शिल्पा वरक यांना आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करताना. सोबत दिलीप वरक व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २८ : डिचोली येथील ओम साई सहायता संस्थेचे मंदार अस्नोडकर यांच्या हस्ते श्रीमती शिल्पा संजु वरक, धनगरवाडा - कुडचिरे हीला आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. यावेळी डिचोली तालुका अध्यक्ष दिलीप वरक, उपाध्यक्ष राजन वरक, सचिव उमेश शिंगाडी तसेच वरक कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते.

काही दिवसा अगोदर संजु वरक यांचे अचानक निधन झाल्याने पत्नी तीन लहान मुले पोरकी झाल्याची बातमी आली होती. डिचोली धनगर समाजोन्नती मंडळाने काही प्रमाणात आर्थिक सहाय्य करण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष दिलीप वरक यांनी सामाजिक संस्थाना मदत करण्यासाठी आवाहन केले होते त्या बातमीची दखल घेउन नेस्ले इंडिया डिचोलीच्या कामगारांनी एकत्र येऊन सुरुवात केलेल्या ओम साई सहायता संस्थेच्या माध्यमातून मदतीचा धनादेश देण्यात आला. सदर कुटुंबाने तसेच धनगर समाज समितीचे अध्यक्ष दिलीप वरक यांनी संस्थेचे आभार व्यक्त केले. तसेच सेवाभावी संस्थांनी खातेदार - शिल्पा संजू वरक, बँक - कॅनरा बँक, साखळी - गोवा ; खाते नंबर - ०३४२१०८०१३८०२, आय एफ एस सी कोड -सी एन आर बी ०००००३४२; एम आय सी आर - ४०३०१५०१७ वर आर्थिक मदत पाठवू शकता.

राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांची काणकोणातील विविध भागांना भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २८ : राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांची काणकोणातील विविध भागाना आज दि. २८ रोजी, भेट देऊन माहिती जाणून घेतली. सर्वप्रथम माने, येथील श्री निराकार देवस्थानला भेट देऊन श्रींचे दर्शन घेतले.

यावेळी त्यांच्या सौभाग्यवती श्रीमती पिल्लई, आमदार व राज्याचे सभापती रमेश तवडकर, राज्यपालांच्या कार्यालयाचे अधिकारी मिहिर वर्धन, विश्राम बोरकर, काणकोण उपजिल्हाधिकारी प्रतापराव नाईक गावकर, मामलेदार गजेंद्र शिरोडकर, निराकार देवस्थानचे अध्यक्ष शैलेश प्रभुगावकर, बाबुली मास्तर, भुषण प्रभुगावकर, सरपंच निशा च्यारी, उपसरपंच चंद्रकांत सुधीर, पंचसदस्य अजय लोलयेंकर, पंकज नाईक, देवस्थान समितीचे पदाधिकारी व अन्य उपस्थित होते.

यावेळी माशें येथील स्वातंत्र्यसैनिक स्मारकाला श्री पिल्लई व सभापती रमेश तवडकर यांच्याहस्ते पुष्पचक्र अर्पण केले. देवस्थान समितीतर्फे राज्यपाल श्री पिल्लई यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक मनोहर व शोभा प्रभुदेसाई यांच्या 'मनोशोभा' निवासस्थानाला त्यांनी भेट दिली. राज्यायपाल श्री पिल्लई यांनी मनोशोभाच्या तस्विरीला हार अर्पण केला. संदेश प्रभुदेसाई यांनी गोव्याच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी काणकोण स्वातंत्र्य सैनिकांची माहिती राज्यापालाना दिली.

त्यानंतर पैंगीण श्रद्धानंद विद्यालयात वळ असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारकाला पुष्पचक्र वाहण्यात आले. यावेळी सरपंच सविता तवडकर, उपसरपंच सुनील पैंगीणकर, पंचसदस्य सतीश पैंगीणकर, महेश नाईक व अन्य पंचसदस्यानी राज्यपालांचे स्वागत केले. सुप्रसिद्ध वास्तुरचनाकार योगेश प्रभुगावकर,यांनी स्वहस्ते काढलेले राज्यपालांचे चित्र श्री पिल्लई यांना भेट केले. त्यानंतर राज्यपाल श्री. पिल्लई यांनी पैंगीण येथील बेताळ देवालयाला भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष हरिष प्रभुगावकर, मिलींद शेणवी, संदेश प्रभुगावकर, महेंद्र फळदेसाई व अन्य उपस्थित होते.

CHANGE IN NAME

I, **JOCELYN TEREZINHA FIGUEIREDO DSOUZA**, r/o Flat no. A/F2, Block A, Prime Enclave, Alto Chicalim, Chicalim, Goa 403711, change my name from **JOCELYN TEREZINHA FIGUEIREDO E DSOUZA** to **JOCELYN TEREZINHA FIGUEIREDO DSOUZA**.

Hereafter in all my dealings and documents, I will be known by the name **JOCELYN TEREZINHA FIGUEIREDO DSOUZA.**

Sd/- **JOCELYN TEREZINHA FIGUEIREDO DSOUZA**

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public in general that my client Mr. Shabbir Mohammad Sharif Sandi, being the owner of the shop no. 1 admeasuring an area of 38 .03 Sq. Mts Situated on the ground floor of the building Delta Point Constructed on plot no. 1 and 6 of the property known as Soto Mollo surveyed under Survey no. 151/2 of village Ponda declares that his shop is subject matter under dispute in Regular Civil Suit No. 30/2023/C at Ponda.

Any person, individual, bank, financial institutions, firm, association, society, authority and or any other person, if have been contacted for sale of the said shop shall take note of the same.

Place :-Panaji
Dated: 27.05.2025

Sd/- **ADV. HRUDAYNATH SHIRODKAR**
312, 3rd floor, Nizmar Centre, Next to EDC house, Dr. Atmaram Borkar Road, Panaji Goa 9422639131
SEAL
email : hruday23@gmail.com

Change of Name

I, **HASSINA BI**, R/O. F.NO. G-5, Block B, Ratnadeep Appts, Patrong Baina, Vasco Da Gama, South Goa 403802. Have changed my name from **HASSINA BI MAMLECAR** to **HASSINA BI**, Hereafter in all my dealings, Documents & ID Proofs, I will be known by the name **HASSINA BI.**

sd/-
HASSINA BI.

CHANGE OF NAME

I, JOSEFA DIAS E GOMES, R/O H.No. 973/2, Bacbhatt, Raia, Salcete, Goa 403720 holding Passport No. W9462919 would like to change my name from JOSEFA DIAS E GOMES to JOSEFA DIAS as per my Aadhar Card No. 5180 1803 3395. Here after in future in all my dealings and documents, I will be known by name JOSEFA DIAS.

Office of the Village Panchayat
Sernabatim, Vanelim, Colva & Gandaulim
Salcete-Goa Pin Code 403 708 Ph: 0832-2788485
Email: vpcolva@gmail.com www.colvapanchayat.in

Ref. No.: VP/SVCG/463/2025-2026 Date: 28/05/2025

NOTICE

Quotations are invited on behalf of Village Panchayat of Colva to undertake developing of Panchayat accounting software for village panchayat Colva.

Quotation should reach this office on or before or latest by 02/06/2025 up to 4:00 pm.

Opening of quotation will be on 03/06/2025 in the fortnightly meeting. Right to accept or reject any or all is fully reserved with this Panchayat.

SD/- **SUZIE FERNANDES** (SARPANCH), Village Panchayat
Sernabatim, Vanelim, Colva & Gandaulim
SEAL

पुणे सांस्कृतिक कार्यक्रमात हरमल पंचक्रोशी स्कूलचे घवघवीत यश

पुणे : ग्लोबल संस्कृतिक संघ आयोजित सोहळ्यात बक्षीस प्राप्त प्रथा नाईक, लवू परब, प्राप्ती नाईक, पूर्वी परब व देवांक पालयेकर.

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २८ : पुणे अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, ग्लोबल कौन्सिल ऑफ आर्टस अँड कल्चरलतर्फे आयोजित केलेल्या विविध स्पर्धात हरमल पंचक्रोशी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

यात हार्मोनियम सोलो गटात प्रथम प्राप्ती नाईक, द्वितीय देवांक पालयेकर तर तबला सोलो गटात प्रथम प्रथा पांडुरंग नाईक, द्वितीय लवू परब व तृतीय पूर्वी संजय परब यांना प्राप्त झाले.

त्यांच्या या यशाबद्दल चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर तसेच हायस्कूलच्या मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर व शिक्षक वर्गाने कौतुक केले आहे. दरम्यान, या चमुची थायलंड सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी निवड झाली असल्याने पंचक्रोशीत कौतुक केले जात आहे.

नानोडा शांतादुर्गा कळंगुटकरीण मंदिरात गायनाचा कार्यक्रम रंगला

नानोडा : शांतादुर्गा कळंगुटकरीण मंदिराच्या प्रासादात गायन सादर करताना गायिका सुखदा वैद्य, संवादिनीवर साहिल वैद्य, तबल्यावर गजानन कळंगूटकर व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २८ : सध्या विरार-मुंबई येथे वास्तव्यास असलेली गोमंतकीय गायिका सुखदा वैद्य यांचा अभंग, भावगीत, भक्तिगीतांचा कार्यक्रम नानोडा येथील श्री शांतादुर्गा कळंगुटकरीण मंदिराच्या प्रासादात उल्हासित अशा वातावरणात रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत रंगला.

यावेळी गायिका सुखदा वैद्य यांनी कल्याणकारी राम राम, निर्गुणाचा संग धरिला जो आवडी (अभंग), अनादी निर्गुण प्रगटली भवानी आईचा जोगवा अशी आणि चांगल्या आवाजाची सुमधुर गाणी गाऊन रसिकांची मने जिंकली. त्यांना संवादिनीवर साहील म्हामल, तर तबल्यावर गजानन कळंगूटकर यांनी साथसंगत केली. यावेळी लता कानोळकर यांनी श्री शांतादुर्गा देवीवर आधारित कविता सादर केली.

गायनाच्या कार्यक्रमानंतर पुरोहिताकडून श्रींची आरती तीर्थप्रसाद देण्यात आला. गायिका सुखदा वैद्य या सध्या मुंबई येथे गायनाचे धडे घेत आहे. शुभदा कळंगूटकर यांनी सूत्रसंचालन तर लता कानोळकर यांनी आभार मानले.

पार्से पंचायत क्षेत्रातील रस्ता धोकादायक

- पार्से मुख्य रस्त्यावर मालवाहू वाहन रुतले
- रस्ता दुरुस्तीसाठी दिरंगाई

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २८ : पार्से पंचायत क्षेत्रातील रस्ता अत्यंत धोकादायक स्थितीत बनला आहे. या रस्त्यावर वाहने रुतण्याचा प्रकार घडत असल्यामुळे वाहन चालक वाहने रस्त्याच्या कडेला साईड देताना घाबरत असल्याचे चित्र दिसून येते.

या रस्त्यावर तुये नवीन पाणी प्रकल्प ते पार्से आगरवाडा चोपडे पर्यंत जलवाहिनी टाकण्याचे काम ठेकेदाराने हाती घेतले आहे. ज्या ज्या ठिकाणी जलवाहिनी पाईप टाकण्यात आले. त्या ठिकाणी रस्ता व्यवस्थित बूजवला गेला नाही. आणि अचानक पाऊस कोसळत असल्यामुळे कंत्राटदराला अनेक अडचणी येतात.

पार्से : येथील रुतलेली मालवाहू ट्रॅक, रस्ता.

कंत्राटदाराने मागच्या दोन दिवसांपूर्वी श्री भगवती मंदिर ते चावडेवाडा पर्यंत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु त्यानंतर काम बंद केले. त्याच पुढे चणेकर निवासस्थानासमोर एका मालवाहू वाहनाने दुसऱ्या वाहनाला साईड देताना बाजूला गाडी रुतण्याचा प्रकार घडला.

सध्या हा रस्ता अत्यंत धोकादायक स्थितीत असून या रस्त्यावर पावसामुळे जी चर होती ती चर त्याचा आकार वृंदावत चाललेला आहे. सुरुवातीलाच कंत्राटदाराने जलवाहिनी टाकण्यासाठी अर्धा रस्ता आपल्या ताब्यात घेऊन अर्ध्या रस्त्याच्या मधोमध जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेतलं. त्यामुळे अर्धा रस्ता तेवढा चांगला असला तरी गेल्यावर्षी त्या बाजूच्या रस्त्याने वीज भूमिगत केबल घालण्यासाठी रस्ता खणला होता .तोही रस्ता व्यवस्थित बुजवला गेला नाही. परिणामी दोन्ही बाजूने एका बाजूने जलवाहिनी दुसऱ्या बाजूने भूमिगत वीज केबल घालून रस्ते खराब करण्याचं काम कंत्राट दराने केलं. आता कंत्राटदार संबंधित नागरिकही पावसाला दोष देऊन मोकळे होतात. परंतु पाऊस नसताना ज्यावेळी भूमिगत केबल घालून आणि जलवाहिनी टाकल्यानंतर रस्ता का बुजवला गेला नाही? असा प्रश्न वाहन चालक उपस्थित करत आहेत.

याविषयी पार्सेचे सरपंच अजय कळंगुटकर यांच्याकडे संपर्क साधला असता अचानक पाऊस पडल्यामुळे कामाचा परिणाम रस्ता दुरुस्तीवर झाला आहे. लवकरच रस्त्याचे दुरुस्ती केली जाईल, असे ते म्हणाले.

डेस्टिनी म्युझिक अकॅडमीची संगीत मैफिली रंगतदार

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २८ : डेस्टिनी म्युझिक अकॅडमी, साखळी आयोजित १२ वी वार्षिक संगीत मैफिल रवींद्र भवन, साखळी येथे उत्साहात पार पडली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा, अथक परिश्रमांचा आणि संगीत उत्कृष्टतेचा अप्रतिम संगम पाहायला मिळाला.

अकॅडमीचे मार्गदर्शक समीर प्रभू यांनी डेस्टिनी म्युझिक अकॅडमीचा १२ वर्षांचा प्रवास उलगडत, संस्थेच्या भावी दृष्टीकोनाविषयी उपस्थितांना माहिती दिली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध गायक आणि कवी साईश पाणंदीकर उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, कला ही शहरी वा ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये भेद करत नाही. ती आपल्याला भावना आणि अभिव्यक्तीद्वारे जोडते.

साखळी : डेस्टिनी म्युझिक अकॅडमी, साखळीच्या विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.

विशेष अतिथी म्हणून उपस्थित शेट्ये इस्टेट्सचे मालक आणि बाबा सावईकर सेवा प्रतिष्ठान व ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र डिचोलीचे संस्थापक रमाकांत शेट्ये यांनी अकॅडमीच्या १२ वर्षांच्या यशस्वी प्रवासाबद्दल संचालकांचे अभिनंदन केले आणि संगीत शिक्षणाच्या प्रसारासाठी संस्थेच्या कार्याची स्तुती केली.

खास निमंत्रित म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार आणि अकॅडमीचे खंदे पाठीराखे शिवानंद खेडेकर,रवींद्र भवन सांखळीचे उपाध्यक्ष विशांत चिमुलकर व अकॅडमीचे संस्थापक संचालक पॅट्रिसन आंद्राद, मार्गदर्शक समिर प्रभू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे महत्त्वाचे आकर्षण ठरले ते म्हणजे १०४ विद्यार्थ्यांचे गायन व वाद्य सादरीकरण, ज्यांनी विविध शैलींमधून आपली संगीत क्षमता दर्शवत उपस्थितांची मने जिंकली.यावेळी अनेक विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विशेषत: ट्रिनिटी स्कूल ऑफ म्युझिक,लंडनच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या २१ विद्यार्थ्यांना विशेष सन्मान देण्यात आला.

विशेष पुरस्कार विजेते-उत्कृष्ट विद्यार्थी सुस्मिता भगत,सर्वोत्तम सादरकर्ते ऍरॉन वाझ, सर्वात शिस्तबद्ध विद्यार्थी श्रीकांत गावंकर,टॉपर -साईनाथ गावकर.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऑड्री झेवियर यांनी केले. तर दीप्ती घोडगे यांनी आभार प्रदर्शन केले. वार्षिक संगीत मैफिल यशस्वी करण्यासाठी महादेव गावकर,सतिश गावकर,अखिल गोपाळकृष्णन, रामचंद्र सावंत, नितिश नाईक, सुवर्षा भगत, सुस्मिता भगत, डॉ.अंकिता आमशेकर, सुयश कामत, कृष्णा च्यारी, श्रवण नाईक, देवराज माजिक यांचे विषेश सहकार्य लाभले.

प्रवर्तन निदेशालय
भारत सरकार
प्रथम एवं द्वितीय मंजिल, 'जीवन विश्वास', एल.आई.सी. बिल्डिंग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो प्लाजा, पणजी, गोवा 403001
Government of India
ENFORCEMENT DIRECTORATE
1st & 2nd Floor, 'Jeevan Vishwas', LIC Building, EDC Complex, Patto Plaza, Panaji, Goa 403001.
Off.: 0832-2404750. Fax: 0832-2438189

F. No. Admn-11028/3/2024-PJZO Dated:28.05.2025

Tender No.01/2025

NOTICE INVITING TENDER FOR HIRING OFFICE ACCOMMODATION FOR DIRECTORATE OF ENFORCEMENT, PANAJI ZONAL OFFICE, GOA

Directorate of Enforcement, Govt. of India, Panaji Zonal Office invites e-tenders for hiring office accommodation measuring around 16000 Sq. ft.-21000 Sq ft of Built Up area in areas **Kadamba, Patto, Panaji, Bambolim, Ribander, Taleigao & Porvorim** from eligible and interested bidders.

Detailed NIT may downloaded from the website https://enforcementdirectorate.gov.in/ and https://eprocure.gov.in/eprocure/app from 29.05.2025 at 11:00 Hours onwards. Last date and time for submission of e-tender online is 30.07.2025 at 15.00 Hrs.

-sd-
Bhaskar Naidu Kondeti
Assistant Director
Enforcement Directorate
Panaji Zonal Office

पाहिजेत

"Wanted Trained Undergraduate Teacher to teach Indian Languages on Contractual basis till 15.10.2025. Walk in interview with relevant documents and valid employment exchange card on 03.06.2025 at 10.00 a.m. at Santa Cruz H/S, Santa Cruz, Tiswadi – Goa."